अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नविन औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय** क्र संकिर्ण-२०१०/(१६५/२०१०)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० जून, २०१०.

संदर्भः- १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेली यादी .
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेले पत्र क्र. २/ एनजीसी/अभातंशिप-यादी/शा.मान्यता/२०१०/१२४१, दिनांक ३० जून, २०१०.

**शासन निर्णयः-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ करिता खाली नमूद संस्थेस नविन औषधनिर्माणशास्त्र (पदवी अभ्यासक्रम ) महाविद्यालय ६० प्रवेशक्षमतेत सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | चन्नाबसवेश्वर फार्मसी कॉलेज,<br>बसवेश्वर चौक, कावा रोड, लातूर ४१३५१२ | बी. फार्मसी | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थांना खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ नविन औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम महाविद्यालय ६० प्रवेशक्षमतेत सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधन कारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापिठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापिठांची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

आ.क्र. ९६
दि. १५/७/२०१०

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य मुंबई व संबंधित विद्यापिठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

८) संस्थेने त्याच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
संबंधित संस्था (संचालकां मार्फत )

प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\Lole\TEx\GR\New institute.doc

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून राज्यात व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास/प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास/प्रवेशक्षमता पूर्ववत करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. टीईएम-२०१७/प्र.क्र.२१५/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १५ मे, २०१७

**संदर्भ** : संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/ मान्यता/ २०१७/५३५, दिनांक २९.०४.२०१७ व सहपत्रे

**प्रस्तावना :-**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था व नवीन अभ्यासक्रमाची दिनांक २५.०४.२०१७ रोजीच्या ई-मेल द्वारे तंत्र शिक्षण संचालनालयास प्राप्त झालेली यादीच्या अनुषंगाने संचालक, तंत्र शिक्षण यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. प्रस्तुत प्रकरणी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, संचालक, तंत्र शिक्षण यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे रिट याचिका क्रमांक ४५८६ /२०१५ बाबत दि. १४.०८.२०१५ मध्ये दिलेला न्यायालयीन निर्णय विचारात घेता, सोबत जोडलेल्या **प्रपत्र अ**-(Annexure A) व **प्रपत्र-ब** (Annexure B) मध्ये नमूद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमे विद्यमान संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी व पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यास व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने थेट कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत केल्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सोबत जोडलेल्या **प्रपत्र अ**-(Annexure A) व **प्रपत्र-ब** (Annexure B) मध्ये नमूद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमे विद्यमान संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी व पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यास व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने थेट कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत करण्यास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२.प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

३.शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४.सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

५.संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६.सदर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

७.शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

८.संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट,१९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

९.संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०.संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

११.रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१२.याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१३.ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतिम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०५१५१५१७२७६३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr.Kiran Patil Digitally signed by Dr.Kiran Patil Date: 2017.05.17 12:17:53 +05'30'

( डॉ.किरण पाटील )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व)
३. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. सर्व संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

६. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली.
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
१०.निवड नस्ती/तांशि-४.

| Sr. No. | Institute Code | NAME OF THE INSTITUTE | INSTITUTE ADDRESS | INSTITUTE DISTRICT | INSTITUTE CITY | INSTITUTE TYPE | WOMEN INSTITUTE APPROVED | MINORITY INSTITUTE | PROGRAMME | AFFILIATING UNIVERSITY DEPARTMENT | LEVEL OF COURSE | COURSE | SHIFT | FULL TIME / PART TIME | APPROVED INTAKE 2016_17 | APPROVED INTAKE 2017_18 | Variation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | 3190 | TERNA PUBLIC CHARITABLE TRUST'S TERNA ENGINEERING COLLEGE | PLOT NO 12, SECTOR 22, PHASE II , OPPOSITE NERUL RAILWAY STATION, NERUL (WEST) | THANE | NAVI MUMBAI | Unaided - Private | No | No | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University, Mumbai | UNDER GRADUATE | CIVIL ENGINEERING | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 11 | 3351 | BHARAT COLLEGE OF ENGINEERING | KANHOR, BADLAPUR (WEST) | THANE | BADLAPUR (WEST) | Unaided - Private | No | No | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University, Mumbai | UNDER GRADUATE | CIVIL ENGINEERING | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 12 | 3190 | TERNA PUBLIC CHARITABLE TRUST'S TERNA ENGINEERING COLLEGE | PLOT NO 12, SECTOR 22, PHASE II , OPPOSITE NERUL RAILWAY STATION, NERUL (WEST) | THANE | NAVI MUMBAI | Unaided - Private | No | No | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University, Mumbai | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 13 | 5187 | SMT.SHARADCHANDRIKA SURESH PATIL COLLEGE OF PHARMACY, CHOPDA | MGS MANDAL CAMPUS, YAWAL ROAD, | JALGAON | CHOPDA | Unaided - Private | No | No | PHARMACY | North Maharashtra University, Jalgaon | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 60 | 100 | 40 |
| 14 | 2253 | CHANNABASWESHWAR PHARMACY COLLEGE ( DEGREE) | BASWESHWAR CHOWK, KAVA ROAD, | LATUR | LATUR | Unaided - Private | No | No | PHARMACY | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 60 | 100 | 40 |
| 15 | 2554 | MAULI COLLEGE OF PHARMACY(B.PHARM) | AT POST TONDAR | LATUR | UDGIR | Unaided - Private | No | No | PHARMACY | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 60 | 100 | 40 |
| 16 | 5410 | GOKHALE EDUCATION SOCIETY'S SIR DR. M. S. GOSAVI COLLEGE OF PHARMACEUTICAL EDUCATION & RESEARCH | PRIN. T. A. KULKARNI VIDYANAGAR, COLLEGE ROAD, | NASHIK | NASHIK | Unaided - Private | No | No | PHARMACY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 60 | 100 | 40 |
| 17 | 5405 | MATOSHRI COLLEGE OF PHARMACY | EKLAHARE, NEAR ODHA GAON, AURANGABAD HIGHWAY NASHIK, MAHARASHTRA | NASHIK | EKLAHARE | Unaided - Private | No | No | PHARMACY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 60 | 100 | 40 |
| 18 | 3480 | YASHWANTRAO BHONSALE COLLEGE OF PHARMACY | A/P CHARATHE(VAZARWADI) S NO 192/2/1 TAL SAWANTWADI | SINDHUDURG | SAWANT WADI | Unaided - Private | No | No | PHARMACY | Mumbai University, Mumbai | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 60 | 100 | 40 |